ePaper

## 'विराट' शतक, टीम इंडियाची उपांत्य फेरीत धडक, पाकिस्तानचा हिशोब क्लिअर

| वर्ष - 8 | अंक - 219 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™



### आतील पानांत

- रोहितचं विजयानंतर मोठं वक्तव्य
- सचिन तेंडुलकरही झाला अवाक्
- अमेरिकेचा फायदा करून घेतलाय
- मुख्यमंत्र्यांविरोधात विरोधी पक्षनेता!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 24 फेब्रुवारी 2025 | मुंबई आवृत्ती | mahaenews.c

## आजारी माणूस योग्य उपचारासाठी तडफडतो

# 'केईएम' ची आरोग्य यंत्रणा "मृत्युचा सापळा"

## आरोग्य मंत्री लक्ष देतील काय? : असहाय गोरगरिबांचा जातोय जीव

**| मुंबई | शीतल करदेकर |**

**दि १४ जानेवारी २०२५ला पहाटे ४ला (८ तास उपचाराविना तडफडून थंड पडलेल्या) हरीष रामचंद्र करदेकर यांना ऑक्सिजन लावले. थंड स्ट्रेचरवर ब्लडप्रेशर वाढण्याची प्रतिक्षा .. यंत्रणेला हलवल्यावर सकाळी ७ च्या दरम्यान वेन्टिलेटर काढला गेला. त्याच दिवशी वॉर्ड नं २० मध्ये खूप काही घडलं... एक जीव बळी गेला. आता आणखीन भयंकर घटना समोर आली. मृत सौ.तेजस्विनी किरण पाटील सोबत त्यांचा १ महिन्याचा प्रीमॅच्युअर्ड मुलगा यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध त्यांचे पती किरण नरेंद्र पाटील यांच्या सोबत घडलेला प्रकार अत्यंत गंभीर आहे. केईएममध्ये मोठ्या सोयी मोठे डॉक्टर्स आहेत म्हणून पेशंट इथे येतात! पण इथे तसं काही नसून इथल्या डॉक्टर्स व यंत्रणेच्या हाती असलेली छळ छावणी आहे. इथे आजारी माणूस योग्य उपचारासाठी तडफडतो.**




अपुरी मशिनरी, औषधाच आणि सगळंच दुष्टचक्र, मोठं रेकेट आहे. योजना कागदोपत्री मंजुर होते पण लाभ होतं नाही. औषधे नाही . मग याचं पुढे काय,पेशंटसाठी आणलेली औषधं,प्लेटलेट्स, रक्त याचा उपयोग पेशन्टसाठी झाला नाही तर पुढे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

केईएमच्या बेजबाबदार यंत्रणेचा बळी ठरलेले हरीष करदेकर यांच्या बाबतचा संतापजनक अनुभव त्यांच्या पत्नी व "महाईन्यूज" व्यवस्थापकीय संपादक शीतल करदेकर यांना आला. या कृतरतेचा कळस असलेल्या यंत्रणेमुळे करदेकर यांची कधीही भरुन न येणारी हानी झाली आहे. अशी एकच नाही, दिवसागणिक अनेक रुग्णांना आपला जीव गमवावा लागत आहे. याला जबाबदार कोण? असा प्रश्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यामध्ये लक्ष घालावे आणि संपूर्ण केईमच्या जबाबदार डॉक्टर व अधिकाऱ्यांवर कठोर करावाई करावी, अशी मागणी होत आहे.

पेशंटला घाबरवणारे डॉक्टर तो मरणार, रिपोर्ट येण्याआधी भाकीत कसं करतात? बाळंतपण डिलेवरी रूममध्ये न होता दुसऱ्या वॉर्डमध्ये इतर पेशंटच्या नातेवाईकांसमोर का होते सीसी टिव्हीत रेकॉर्ड का होते? तिथेच आंघोळ घालण्याची जबरदस्ती पुरुष व महिला डॉक्टर कशी करु शकतात? बोनमँरो.चं दुकान सूरु आहे. अशी खूप भयंकर मनमानी छळणारी अपमानित करणारी राक्षसी जमात इथे कार्यरत आहे, असा संताप रुग्णांच्या नातेवाईकांमधून होतो आहे.

### गर्भवती महिलेचा उपचारअभावी मृत्यू...

मृत सौ.तेजस्विनी किरण पाटील सोबत त्यांचा १ महिन्याचा प्रीमॅच्युअर्ड मुलगा यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध त्यांचे पती किरण नरेंद्र पाटील यांच्या सोबत घडलेला प्रकार अत्यंत गंभीर आहे. ज्या प्रकारे गरोदर व कँन्सरची लक्षणे दिसलेल्या तेजस्विनी पाटील यांच्यावर उपचार केले गेले. जननी सुरक्षा योजना, राजीव गांधी योजना, कँन्सर पेशंट एड या सगळ्यात योजना लागू करूनही औषधे इंजेक्शन नाही. मिळालेल्या इजेक्शन चा उपयोग डॉक्टर करत नाही. एमआयसीयू वॉर्डमधील झालेली डिलेवरी तेथील सर्वलोकांनी पाहिली सीसी टीव्हीत रेकॉर्ड झाली. डिलिव्हरी होऊ लागली तेव्हा डॉक्टर व नर्स उपस्थित नव्हत्या, अशी आपबिती पीडित किरण पाटील यांनी सांगितली आहे.

### पार्टटाइम प्रशासन नको...



केईएम सारख्या रुग्णालयामध्ये सरकारने फक्त योजना घोषणा,उद्घाटन करून आपले काही आरोग्य दूत पगारी दलाल ठेवून चालणार नाही. इथे सगळा हमामच नंगा काळाकुट्ट आहे; काही अपवाद.वगळता! इथे.खड्यातले चांगले तांदूळ वेचून काम पुढे नेणे आवश्यक आहे. अनियंत्रित यंत्रणा नियंत्रणात आणण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा! अशी भयंकर परिस्थिती मनपा व सर्व हॉस्पिटल्सची आहे.तितक्याच ताकदीने काम करणाऱ्या मंत्री सरकारी अधिकाऱ्यांची आहे. इथे.पार्टटाइम प्रशासन नको।२४ तासाचे संवेदनशील नियंत्रण करणारे अधिक्षक हवेत, अशी मागणी मीडिया असोसिएशन ऑफ इंडियाच्या अध्यक्षा आणि पीडित शीतल करदेकर यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

# पाकिस्तानविरोधात विजयानंतर शहरभर जल्लोष!

## चौकाचौकात फटाके फोडण्यात आले, राष्ट्रध्वज फडकावून तरुणाईने केले नृत्य

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**चॅम्पियन्स ट्रॉफीत भारताने पाकिस्तानवर एकतर्फी विजय मिळवल्यानंतर शहरभर रविवारी रात्री जल्लोष करण्यात आला. चौकाचौकात फटाके फोडण्यात आले. विजयानंतर डेक्कन जिमखाना भागातील नामदार गोपाळकृष्ण गोखले पथ (फर्ग्युसन रस्ता) परिसरात तरुणाईने जल्लोष केला. राष्ट्रध्वज फडकावून तरुणाईने नृत्य केले.**



भारत-पाकिस्तान दरम्यानच्या सामन्याकडे देशवासियांचे लक्ष लागून राहिले होते. रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास सामन्याला सुरुवात झाली. त्यानंतर शहरातील सर्व रस्तावर अघोषित संचारबंदी लागू झाली होती.

चुरशीची लढत होण्याची आशा क्रिकेटप्रेमींना होती. प्रत्यक्षात भारताने पाकिस्तानवर एकतर्फी विजय मिळविला. विराट कोहलीने शतक केल्यानंतर क्रिकेटप्रेमींचा आनंद द्विगुणीत झाला. चौकाचौकात विविध सार्वजनिक मंडळांनी सामन्याचे पडद्यावर प्रक्षेपण केले होते. सामना जिंकल्यानंतर चौकाचौकात जल्लोष,तसेच कार्यकर्त्यांनी नृत्य करुन विजय साजरा केला. पेढे वाटून विजय साजरा करण्यात आला.पाकिस्तानवर विजय मिळविल्यानंतर तरुणाईने फर्ग्युसन रस्ता गाठला. दुचाकींवरुन घोषणा देत तरुणाई डेक्कन जिमखाना भागात जमली. राष्ट्रध्वज फडकावून जल्लोष करण्यात आला. सामना संपल्यानंतर डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन रस्ता परिसरात होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली. रात्री उशीरापर्यंत शहरात जल्लोष सुरू होता.

### महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे.

जबाबदार पोलिसांवर तातडीने कारवाई होणे गरजेची आहे. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असेही आठवले म्हणाले.निवडणुका एकत्रित लढण्याची मागणीही त्यांनी केली.आठवले म्हणाले,'अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढल्या जात नाहीत. महाविकास आघाडीची एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता नाही. पण, महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एकत्रितपणे लढवाव्यात असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे. महायुतीने लोकसभा, विधानसभेला रिपाईला डावलले असले तरी मी त्यांना डावलणार नाही. रिपाई पक्ष छोटा असला तरी गावागावात कार्यकर्ते आहेत. कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत आम्हाला डावलले जाणार नाही, अशी खात्री आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा झाली आहे. संधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे'.'राज्यघटना बदलणार ही अफवा होती, हे लोकांच्या लक्षात आले आहे.

# लहान मुलांमध्ये वाढताहेत दाताच्या समस्या

## कशी काळजी घ्याल जाणून घ्या तज्ज्ञांचा सल्ला

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**दातांमध्ये पोकळी आणि हिरड्यांच्या आजाराने ग्रस्त असलेल्या लहान मुलांची संख्या वाढत आहे. लहान मुलांमध्ये दहापैकी किमान सात जणांमध्ये दंत समस्या दिसून येत आहेत. दुधाचे दात पडणारच आहेत म्हणून त्यांच्या किडण्याकडे दुर्लक्ष केले जात असून, ते चुकीचे आहे. मुलांची नियमित दंत तपासणी करावी, असा सल्ला दंतचिकित्सकांनी दिला आहे.**



अनेक पालक आपल्या बाळाला रात्रीच्या वेळी बाटलीतून दूध अथवा फळांचा रस पाजतात. ही मुले ती बाटली तोंडात ठेवून झोपून जातात. यामुळे ते गोड पदार्थ रात्रभर बाळाच्या तोंडातील दातांवर साठून राहतात.तोंडातील जीवाणू याच गोड पदार्थांना आपला आहार म्हणून वापरतात आणि दातांवर हल्ला करून अम्लपदार्थ सोडतात. यामुळे दात कमजोर बनतात व किडू लागतात. हा प्रकार रोज घडल्याने दुधाचे दात पूर्णपणे किडतात.याबाबत दंचचिकित्सक डॉ. अभिनव तळेकर म्हणाले की, बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी येणाऱ्या ५ ते १५ वर्षे वयोगटातील १० पैकी ७ मुलांमध्ये आता दंत समस्या आढळून येतात. लहान मुलांच्या दंत समस्यांकडे सुरुवातीच्या टप्प्यात लक्ष न दिल्याने नंतरचे दात वाकडे येणे, दुधाच्या दातांमध्ये जागा नसेल किंवा हे दात वेडेवाकडे असतील तर पक्क्या दातांसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसणे, अशा समस्या दिसतात. यासाठी नियमितपणे दंत चिकित्साकांकडे जाऊन तपासणी करणे गरजेचे आहे. बाळाच्या दातांवर काळे किंवा पांढरे डाग पडणे, दात दुखणे, मुलांची चिडचिड होणे, दातांना थंड पदार्थांचा त्रास होणे, तोंडातून दुर्गंधी येणे तसेच दात किडणे अशा समस्या दिसून येतात. लहान मुलांमध्ये दंत समस्यांवर वेळीच उपचार केले नाहीत तर दुधाचे दात लवकर पडू शकतात. दातांचे आरोग्य हे मुलांच्या एकूण आरोग्याचा एक आवश्यक भाग आहे.त्याकडे पालकांनी दुर्लक्ष करू नये. इतर आरोग्य समस्यांप्रमाणेच दीर्घकालीन गुंतागुंत टाळण्यासाठी दंत समस्यांवर वेळीच उपचार करावेत, असे अंकुरा हॉस्पिटलमधील नवजात शिशू विभागाचे प्रमुख डॉ. उमेश वैद्य यांनी स्पष्ट केले.लहान मुलांच्या दातांच्या आरोग्याकडे वेळोवेळी लक्ष द्या.सुरुवातीपासूनच मुलांचे दात स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करा.मुलांना दिवसातून दोनदा टूथपेस्टने ब्रश करायला सांगा. दात दुखू लागल्यास मुले चिडचिड करीत असल्याने त्यावर लक्ष ठेवा. दाताच्या समस्या दिसून आल्यास दंतचिकित्सकांचा सल्ला घ्या.

# शिक्षक भरतीच्या जाहिरातींसाठी मुदतवाढ

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यातील दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरतीसाठी हजारो पात्रताधारक प्रतीक्षेत आहेत. मात्र, पवित्र संकेतस्थळावर भरतीच्या पदांसाठीच्या जाहिराती देण्यास मुदतवाढ देण्यात आल्याचे जाहीर केले असून, आता व्यवस्थापनांना २८ फेब्रुवारीपर्यंत जाहिराती देता येणार आहेत. राज्यात पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यातील भरतीमध्ये निवड झालेल्या सुमारे १८ हजार उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

दुसऱ्या टप्प्यातील भरतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील रिक्त पदे, खासगी अनुदानित शाळांतील रिक्त पदांवर भरती होणार आहे. त्याशिवाय, पहिल्या टप्प्यातील रिक्त पदांचा समावेश दुसऱ्या टप्प्यातील भरती प्रक्रियेत केला जाणार आहे.त्यामुळे दुसऱ्या टप्प्यात किती पदे उपलब्ध होणार, याकडे राज्यभरातील पात्रताधारकांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर, दुसऱ्या टप्प्यातील भरतीसाठी शिक्षण विभागातर्फे जाहिराती देण्यासाठी २० जानेवारी ते २० फेब्रुवारीची मुदत देण्यात आली होती.शिक्षण विभागाने पवित्र संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील १ हजार २०१६ व्यवस्थापन आणि विविध माध्यमांसाठी एकूण १३३७ जाहिरातींची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, बऱ्याच व्यवस्थापनांना जाहिरात देण्यास अजून काही कालावधीची आवश्यकता असल्याने पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्वच शैक्षणिक व्यवस्थापनांनी त्यांच्या अखत्यारितील शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याची कार्यवाही करावी. पवित्र पोर्टलवर जाहिरात देण्यासाठी काही अडचणी आल्यास edupavitra2022@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा.

# मोबाईल टॉवर कंपन्यांवर महापालिकेची कृपादृष्टी!

## थकबाकी वसुलीकडे महापालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग करत आहे दुर्लक्ष

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी, निवासी आणि बिगरनिवासी मोठ्या इमारतींच्या गच्चीवर विविध कंपन्यांनी मोबाईल टॉवर उभारले आहेत. या मोबाईल टॉवर कंपन्याकडे कोट्यवधींचा मालमत्ता कर थकीत आहे. त्या थकबाकी वसुलीकडे महापालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग वर्षानुवर्ष दुर्लक्ष करत आहे.**



राज्य शासनाने मोबाईल टॉवर कंपन्याकडे सामान्य कराच्या १५ टक्के नूसार कर वसुली करण्याचे आदेश दिलेले आहेत. तरीही त्याकडे करसंकलन विभागाकडून कोणीच लक्ष देताना दिसत नाही. सामान्य नागरिकांना ५० हजार रुपयासाठी घराच्या जप्तीचे आदेश काढणाऱ्या महानगरपालिकेकडून मोबाईल टॉवर्सच्या बड्या उद्योगपतीच्या कंपन्यावर कृपादृष्टी का दाखवत आहेत, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रेकॉर्डवर शहरात ९२३ मोबाइल टॉवर आहेत. त्यात ५३३ टॉवर अधिकृत तर ३९० टॉवर अनधिकृतपणे उभे आहेत. अनधिकृत टॉवरकडे महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. शहरात अनेक रहिवाशी व नागरी वस्तीत ग्राहकांना सेवा देण्याच्या नावाखाली नियम डावलून दाट लोकवस्ती मध्ये मोबाइल टॉवर उभे केलेले आहेत. मोबाईल टॉवरच्या धोकादायक रेडिएशनमुळे नागरिकांना गंभीर आजार होण्याची दाट शक्यता आहे. करोडो रुपयांचा नफा कमविणाऱ्या मोबाइल कंपन्या शहराच्या विविध भागात अनधिकृतपणे कोठेही व कसेही टॉवर उभारत आहेत. त्यावर महापालिकेकडून कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून केवळ एक-दोन मोबाईल टॉवर कंपन्यांनी स्वतः हून मालमत्ता कर भरलेला आहे. उर्वरित अधिकृत आणि अनधिकृत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या कंपन्यांनी मिळकत कर थकवला आहे. याबाबत मोबाईल कंपन्यांनी टॉवरची सुमारे ३० कोटींहून अधिक मिळकत कराची थकबाकी आहे. तसेच महापालिकेच्या एका इमारतीवरच अनधिकृत मोबाईल टॉवर असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच काही मोबाईल टॉवरची कर संकलन विभागाकडून अद्याप टॅक्स आकारणी देखील केलेली नाही. तर काही कंपन्या मोबाईल टॉवरवर लावलेल्या कर आकारणी विरोधात न्यायालयात गेल्या आहेत. त्यामुळे अनधिकृत मोबाईल टॉवर उभारुन कंपन्याकडून कोट्यवधींचा व्यवसाय केला जात आहे.

महापालिका क्षेत्रातील लोकसंख्या ३० लाखांच्या घरात गेली आहे. येथील नागरी वस्त्यांमध्ये वाढ होत असल्याने चांगली सेवा पुरवून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी मोबाईल कंपन्यांनी कानाकोपऱ्यात टॉवर्स उभारण्याकडे मोर्चा वळवला आहे. दरम्यान, शहरात ९२३ मोबाईल टॉवर आहेत. यात काही अधिकृत तर काही अनधिकृत आहेत. मोबाईल टॉवर्सवर मालमत्ता कराची थकबाकी करोडोच्या घरात आहे. वारंवार प्रयत्न करूनही, मोबाईल कंपन्यांकडून थकबाकी वसूल होऊ शकलेली नाही. तसेच याबाबत कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून राज्य शासनाच्या आदेशानुसार देखील मोबाईल टॉवर कंपन्याकडून मिळकत कर वसूल केला जात नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### मिळकत कर वसुलीकडे दुर्लक्ष

मोबाईल टॉवर उभारताना अनेक अनधिकृत इमारतींवरही अनधिकृत टॉवर असून, अशा प्रकारचे टॉवर अधिकृत होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. काही मोठ्या हाउसिंग सोसायट्यांनीही अनधिकृतपणे टॉवर उभारले आहेत. दोन वर्षांपूर्वी असे अनधिकृत टॉवर महापालिकेच्या करसंकलन कार्यालयाकडून सील केले होते. मात्र, मोबाईल कंपन्यांनी न्यायालयातून याला स्थगिती आणली होती. त्यानंतर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून मोबाईल टॉवरच्या मिळकत कर वसुलीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

### टॉवर उभारताना नियमांचे उल्लंघन

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक ठिकाणी, टोलेजंग इमारतींच्या गच्चीवर मोबाईल टॉवर उभारले आहे. मात्र, शहरातील विविध इमारतीवर उभारण्यात आलेल्या एकुण ९२३ मोबाईल टॉवरपैकी ५३३ मोबाईल टॉवर अधिकृत आहेत. तर ३९० टॉवरधारक मोबाईल कंपन्यांनी महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. मोबाईल टॉवर उभारताना किरणोत्सर्ग स्तरही तपासावा लागतो. एका ठिकाणी किती टॉवर असावेत, निवासी इमारतीपासून ते किती दूर असावेत?, त्याचेही निकष असतात. परंतु कुणीच हे निकष पाळत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक अवैध इमारतींवरही अनधिकृत टॉवर लावले गेले आहेत. याकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.

### अनधिकृत टॉवर असलेल्या कंपन्या

शहरात अनधिकृत मोबाईल टॉवरचे पेव फुटले आहे. मोबाईल टॉवर अधिकृत करण्यासाठी महापालिकेकडून परवानगी न घेता नागरी वस्तीत ३९० मोबाईल टॉवर उभारले आहेत. यामध्ये जिओ कंपनीचे २१८, इंडस कंपनीचे ९४, व्हीआयओएम नेटवर्कचे १६, सेंचुरी इन्फ्राटेल ४, एअरसेल कंपनीचे ६, एटीसी कंपनीचे १७, रिलायन्स कंपनीचे ७, आयडिया कंपनीचे ४ यासह अन्य काही एक किंवा दोन असे एकूण ३९० मोबाईल टॉवर अनधिकृत उभारण्यात आलेले आहेत. अनधिकृत टॉवरमध्ये मोठ्या कंपन्यांचा समावेश आहे.

---

# निगडी जलशुद्धीकरण केंद्रातून थेट दापोडीपर्यंत पाणी

## थेट दापोडीपर्यंत भूमिगत मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामास सुरुवात

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचे शेवटचे टोक असलेल्या दापोडी व सांगवी परिसरात तसेच, दापोडी ते निगडी मार्गावरील दोन्ही बाजूस निर्माण होणाऱ्या नव्या गृहप्रकल्पांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी महापालिकेतर्फे निगडी, सेक्टर क्रमांक २३ येथून थेट दापोडीपर्यंत भूमिगत मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. त्या कामास सुरुवात झाली आहे.**



निगडी ते दापोडी अशी सर्व्हिस मार्गावरून ही जलवाहिनी टाकली जाणार आहे. जलवाहिनी एक हजार मिलिमीटर व्यासाची आहे. अंतर्गत जलवाहिनी ही ६०० मिलिमीटर व्यासाची असणार आहे. या कामास निगडी, प्राधिकरण येथे गेल्या महिन्यात सुरुवात झाली आहे. जलशुद्धिकरण केंद्रापासून संत बसवेश्वर महाराज पुतळ्यापर्यंत काम सुरू आहे. हे काम सरसकट न करता टप्प्याटप्प्यात केले जाणार आहे. या कामामुळे वाहतूककोंडी होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून सर्व्हिस रस्त्याने ही जलवाहिनी बीआरटी मार्गात टाकण्यात येणार आहे. त्यासाठी बीआरटी मार्ग काही काळ बंद ठेवला जाणार आहे. एकूण १३ किलोमीटर अंतराच्या भूमिगत जलवाहिनी टाकण्याच्या कामाची मुदत दीड वर्षे असून, त्यानंतर निगडी ते दापोडी मार्गावरील सर्व गृहप्रकल्प आणि शेवटचे टोक असलेल्या दापोडी व सांगवी भागांत पुरेसा प्रमाणात पाणी उपलब्ध होईल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यासाठी ५२ कोटी ४२ लाख ३ हजार ७५१ रुपये खर्च अपेक्षित आहे.


### दापोडी, सांगवी, फुगेवाडी भागांना पुरेसे पाणी मिळणार

निगडी जलशुद्धीकरण केंद्रापासून दापोडी येथील पाण्याच्या टाकीपर्यंत भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येत आहे.
त्यामुळे त्या मार्गावरील लोकवस्तीला पाणी मिळणार आहे. तसेच, शहराचे टोक असलेल्या दापोडी, सांगवी, फुगेवाडी या भागांला पुरेसे पाणी उपलब्ध होईल, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### दोन्ही बाजूस टोलेजंग इमारतींची साखळी

मेट्रो मार्गामुळे दुप्पट एफएसआय मिळत असल्याने निगडी ते दापोडी या ग्रेटसेपरेटर मार्गाच्या दोन्ही बाजूस मोठमोठे गृहप्रकल्प तयार होत आहेत. त्यात अनेक नव्या गृहप्रकल्पांची भर पडत आहे. टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. त्या गृहप्रकल्पांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात मिळावे म्हणून महापालिकेकडून त्या मार्गावर स्वतंत्र मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. त्यामुळे या नव्या प्रकल्पांना पुरेसे पाणी मिळणार आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### साधक व नाम

प्रत्येक शब्दात रामच आहे असे ज्यांना वाटते त्यांची तयारी काही निराळीच असते. आपल्याला अमुक एका नावातच प्रेम येते; परंतु सिद्धांना मात्र कोणी कशाचाही उच्चार केला तरी नामाचाच केला असे वाटते. कोणत्या वाचेने नाम घ्यावे याचा नाही विचार करू. जसे होईल तसे नामस्मरण करा, पण नामाची कास सोडू नका. नाम घेऊन नामाचा अनुभव घ्या. विषयाचा घाला जेव्हा पडतो तेव्हा नामाची आठवण ठेवा. प्रल्हादाने नामाशिवाय दुसरे काय केले ? प्रल्हादाने नामावर जसे प्रेम ठेवले तसे आपण ठेवावे. आजवरच्या सर्व भक्तांनी हेच केले. एक नामस्मरण करा, हाच खरा मार्ग. स्मरणात रहा म्हणजे विषय आपोआप मरतील.

साधकाने लोण्यासारखे मऊ असावे. कोणाला कुठेही खुपू नये, आपण हवेसे वाटावे. आपण नि:स्वार्थी झालो तरच हे साधेल. कोणी आपल्या पाया पडताना, 'मी या नमस्काराला योग्य नाही' असे साधकाने मनामध्ये समजावे, म्हणजे कुणी नमस्कार केल्याचा अभिमान वाटणार नाही, आणि न करणाऱ्याचा राग येणार नाही. सत्कर्मानंतर आपली स्तुती ऐकायला साधकाने तिथे उभेसुद्धा राहू नये. भगवंत ज्याला हवा आहे, त्याने असे समजावे की, आपण आता कुस्तीच्या हौद्यांत उतरलो आहोत, अंगाला माती लागेल म्हणून आता घाबरून चालायचे नाही. यासाठी चांगली माणसे पहिल्यानेच मातीत लोळतात, म्हणजे ती लाज जाते.

भगवंताच्या प्राप्तीचे दोन मार्ग आहेत : एक मार्ग म्हणजे, आजपर्यंत सर्व त्याच्या इच्छेने घडून आले, माझे जे सर्व आहे ते त्याचेच आहे, त्याचे तो पाहून घेईल, तो जे करील ते सर्वांच्या हिताचेच करील, उद्याचा दिवस त्याच्या इच्छेनेच यायचा आहे, असे मनाशी ठरवून आपण त्याच्या स्मरणात निश्चिंत राहणे हा होय. दुसरा मार्ग म्हणजे, 'मी जगात कुणाचाच नाही, मी रामाचा आहे' असे म्हणून कुठेही प्रेम न ठेवता त्याच्या स्मरणात राहणे हा होय. हा मार्ग जरा कठीण आहे. यामध्ये मनाने इतर ठिकाणचे प्रेम तोडून टाकायचे असते, कारण प्रेम एकाच वस्तूवर राहू शकते. मन जर आपले ऐकत नसेल तर न ऐकू द्या. आपण चांगले-वाईट शोधावे, आणि त्याप्रमाणे करू लागावे; मन आपोआप तिथे येईल. म्हणूनच, 'आपले मन मारा' असे न सांगता 'आपले मन भगवंताकडे लावा' असेच संत आपल्याला सांगतात.

**बोधवचन:- " हेच माझे सर्वस्व आहे, " असे नामात प्रेम असावे.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# अजितदादा, नासके आंबे, आजच फेकून द्या की राव!

**झाडावर कैरी पाडाला लागली, की आंबा उत्पादक शेतकरी त्या सर्व कैऱ्या उतरवतो आणि सुरक्षित ठिकाणी 'आडी' घालतो. म्हणजे काय तर खाली आणि वर पाला पसरून आंबे पिकवले जातात. आंबे पिकण्याची प्रक्रिया सुरू असताना मधूनच तो ती 'आडी' तपासतो आणि काही आंबे नासले असतील, तर ते फेकून देतो. सांगण्याचा उद्देश एवढाच, की ते आंबे बाजूला काढले नाही तर संपूर्ण आडी नासवण्याची ताकद त्या नासक्या आंब्यांमध्ये असते..!**


हे उदाहरण एवढ्यासाठीच दिले की उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे स्वतः शेतकरी आहेत आणि त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ग्रहण लागले आहे ते भ्रष्ट आणि कोर्टाने शिक्षा सुनावलेल्या मंत्र्याचे.. हे नासके आंबे अजितदादा फेकून का देत नाहीत, हा सर्वसामान्यांच्या पुढचा प्रश्न आहे.

### ..मग 'महायुती' ला नासवतील !

अजितदादांचा पक्ष हा राज्यात सत्तेवर असलेल्या 'महायुती' मधील अतिशय महत्त्वाचा पक्ष आहे. अशा भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई होत नाही, हा संदेश इतरांपर्यंत पोहोचला तर निश्चितपणे भ्रष्टाचाराला खतपाणी घातल्यासारखे वातावरण होऊ शकते आणि मग परिस्थिती हाताबाहेरही जाऊ शकते. अजितदादांनी स्वतः पटकन कारवाई करावी, ही छोटीशी अपेक्षा.. किंवा त्यांनी नाही केली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावले उचलावीत, ही मोठी अपेक्षा !

### कृषी खाते म्हणजे कुरणच ?

गेल्या काही वर्षांपासून राज्याला लाभलेले कृषिमंत्री सरकारचीच अडचण करीत आहेत की काय अशी परिस्थिती आहे. एकनाथ खडसे महसूल आणि कृषिमंत्री असताना त्यांच्या काळात भोसरीच्या भूखंडाचं प्रकरण गाजलं. त्यांना राजीनामा द्यावा लागला. दादा भुसे कृषिमंत्री असताना त्यांच्यावर ड्रग्ज प्रकरणात आरोप झाले होते. त्यानंतर धनंजय मुंडे कृषिमंत्री असताना त्यांच्या काळात वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीत तीनशे कोटी रुपये गैरव्यवहाराचा आरोप झाला. मुंडे यांच्या काळातील प्रतिकृषिमंत्री वाल्मिक कराड यानं शेतकऱ्यांना हार्वेस्टरचं अनुदान मिळवून देतो, असं सांगत लाखो रुपये घेतले आणि हार्वेस्टर आणि अनुदानही मिळालं नाही. त्याअगोदर अब्दुल सत्तार कृषिमंत्री असताना त्यांनी सिल्लोडच्या कृषी प्रदर्शनाच्या नावाखाली कसे पैसे जमा केले, याच्या सुरस कथा सांगितल्या जात होत्या.



### फडणवीस अण्णांच्या 'गुड बुक' मध्ये

आणि आत्ताचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी तर शेतकऱ्यांना भिकाऱ्यापेक्षाही कमी लेखलं. त्यांच्याविरोधात राज्यभर शेतकरी आंदोलन करीत असताना आता त्यांचं सदनिकाप्रकरण बाहेर आलं. एक नव्हे, तर चार सदनिका घेताना त्यांनी कशी फसवणूक केली, हे न्यायालयात सिद्ध झालं. उत्पन्न कमी असल्याचं दाखवत सदनिका घेतल्या. दुसऱ्यांना मिळालेल्या सदनिका बळकावल्या. त्याचवेळी पिस्तुलाचा परवाना घेताना दाखवलेली संपत्ती वेगळी होती. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मंत्र्यांचं चारित्र्य विशुद्ध असायला हवं असं म्हटलं आहे; परंतु हजारे यांच्या 'गुडबुक' मध्ये असलेल्या फडणवीस यांच्या मंत्र्यांचं चारित्र्य तसं आहे का, असा प्रश्न पडतो. उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्ये असलेल्या दोन मंत्र्यांविरोधात याच फडणवीस आणि भाजपनं रान उठवलं होतं. त्यापैकी एकाला फडणवीस यांनाच मंत्रिमंडळात सामावून घ्यावं लागलं. सत्तेसाठी काहीही असंच जणू त्यांच्या वागण्याचं कारण आहे. पंतप्रधानांना त्या मंत्र्यांच्या जिल्ह्यात न्यावं लागावं, हा काव्यगत न्याय म्हणावा लागेल.

### विरोधी पक्षात असताना वेगळी भूमिका..

विरोधी पक्षात असताना एक भूमिका घ्यायची आणि सत्ताधारी असताना दुसरीच घ्यायची, हे सर्वंच नेत्यांच्या बाबतीत जे घडतं, तेच देवेंद्र यांच्याबाबतीतही घडलं आहे. जनतेनं प्रचंड बहुमत दिलं आहे. त्यातही भाजपला १३७ जागा दिल्या असताना 'कलंकित' मंत्र्यांचं समर्थन करण्याची वेळ त्यांच्यावर का यावी, हा प्रश्नच आहे. ज्यांच्यावर आरोप आहेत, ते मंत्री मित्रपक्षांचे आहेत, असं सांगून नामानिराळे होण्याची सोय नाही. पूर्वी फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील काही सहकाऱ्यांची प्रकरणं उच्च न्यायालयात गेली होती आणि अनेक घोटाळ्यांचे आरोप झाले, त्यांनाही सामावून घेताना हजारे यांचा विशुद्ध चारित्र्याचा सल्ला कुठं गेला, याचं उत्तर मिळत नाही. आता तर हजारे यांनीच थेट या मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी अप्रत्यक्षपणे केली आहे. फडणवीस आता तरी मनावर घेणार का, हा खरा प्रश्न आहे. पण, ते गप्प बसले तर त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलेल, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे!

### 'सळो की पळो' करून सोडले होते..

अतिशय आक्रमक विरोधी पक्षनेता ही भूमिका निभावताना फडणवीस यांनी यापूर्वी सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारला 'सळो की पळो' करून सोडलं होतं. याच फडणवीसांनी तीन तीन मंत्र्याचा राजीनामा घेण्याची वेळ ठाकरे यांच्यावर आणली होती. पण, त्याच फडणवीसांच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्यावर गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळापासून गंभीर आरोप केले जात आहे. त्यांच्या कृषिमंत्रिपदाच्या काळातील कारभाराची लक्तरं वेशीवर टांगली जात आहेत.

### मंत्र्यांचं रोजच वस्त्रहरण

सामाजिक कार्यकर्ते, माहिती अधिकार कार्यकर्ते आणि फडणवीस यांच्याच पक्षाचे आमदार आपल्याच सरकारमधील मंत्र्यांचं वस्त्रहरण करीत आहेत. अजितदादांनी तर त्यांची पाठराखण केलीच आहे, शिवाय आरोप असलेल्या मंत्र्याला त्यांनी 'कोअर कमिटी'त घेतलं. 'एसआयटी' चौकशीचा अहवाल बाहेर येऊ द्या. दोष सिद्ध झाले, तर मंत्रिमंडळातून वगळू, अशी भूमिका सुरुवातीला घेणाऱ्या अजितदादांनी अखेर आरोप झाल्यानंतर चौकशी अहवालाची वाट न पाहता आपण राजीनामा दिला होता, राजीनाम्याबाबत मुंडेच निर्णय घेतील, असं सांगायला सुरुवात केली. परंतु आता, माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत तर न्यायालयानंच दोषी ठरवल्यानंतर राजीनामा घेण्यात काय अडचण आहे? असा प्रश्न विचारला, तर त्यावर अजितदादांकडं काहीच उत्तर असणार नाही.

### एकाला एक न्याय, दुसऱ्याला दुसरा

सुरतच्या न्यायालयानं दोन वर्षे शिक्षा दिली, तर लोकसभेचे अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांनी लगेच त्यांचं लोकसभा सदस्यत्व २४ तासांच्या आत रद्द केलं. महाराष्ट्रातही सुनील केदार यांना नागपूर जिल्हा बँक प्रकरणात शिक्षा झाल्यानंतर विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांचं विधानसभेचं सदस्यत्व २४ तासांच्या आत रद्द केलं. आता तेच नार्वेकर विधानसभेचे अध्यक्ष असताना कोकाटे यांच्याबाबतीत त्यांनी तातडीनं निर्णय का घेतला नाही., असा प्रश्न पडतो आणि तो जास्त गंभीर आहे.

### अध्यक्षांच्या निष्पक्षपातीपणाबद्दल संभ्रम

विधानसभेच्या अध्यक्षांच्या निष्पक्षपातीपणाबद्दल सर्वोच्च न्यायालयानं यापूर्वी शंका घेतली होतीच. आता त्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. मित्रपक्षांच्या मंत्र्यांवर आरोप आहेत, असं म्हणत फडणवीस यांना मोकळं होता येणार नाही. ते ज्या सरकारचे प्रमुख आहेत, त्या सरकारवर शिंतोडे उडत असून, काही शिंतोडे 'मिस्टर क्लीन' म्हणवणाऱ्या फडणवीसांच्या अंगावरही उडतील याचं भान त्यांनी ठेवायला हवं.

प्रचंड बहुमत असताना वास्तविक महाराष्ट्रातील 'महायुती' सरकारचा कारभार हा सुरळीत चालायला हवा, अशी एक कल्पना प्रत्येक नागरिकांने आपल्या मनात बांधली आहे. परंतु, या बहुमताचा उपयोग आता भ्रष्टाचार दडपण्यासाठी किंवा मनमानी चालवण्यासाठी केला जातो की काय अशी एक शंका येऊ लागली आहे. मंत्र्यांनी अजितदादांवर ढकलणे, मुख्यमंत्र्यांनी अजितदादांकडे बोट दाखवणे असे प्रकार आता बालिशपणाचे वाटू लागले आहेत. त्यापेक्षा अजितदादांनीच पुढाकार घेऊन दोन्ही मंत्र्यांना पक्षातून हटवावे, आणि सरकारची ढासळत असलेली प्रतिमा सावरावी, अशी एक माफक मागणी करायला काय हरकत आहे?नन

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचं

## गोऱ्हे यांच्या आरोपानंतर राजकीय वर्तुळात खळबळ

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**नवी दिल्ली येथे ९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चालू आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या ‘असे घडलो आम्ही’ या कार्यक्रमात शिवसेनेच्या (शिंदे) नेत्या व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेवर (ठाकरे) मोठा आरोप केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज कार दिल्यावर एक पद मिळायचं, असा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे. नीलम गोऱ्हे यांच्या या आरोपानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गोऱ्हे यांच्या या वक्तव्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. शिवसेनेकडूनही (ठाकरे) यावर प्रतिक्रिया आली आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी गोऱ्हे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. अंधारे यांनी गोऱ्हे यांचा चापलूस व गद्दार असा उल्लेख केला आहे.**



### त्यांची उंची वाढवायची नसते

परदेशात किती पैसे गुंतवले? या प्रश्नांची उत्तरं नीलम गोऱ्हे यांनी द्यायला हवीत. त्यांनी शिवसेनेला (ठाकरे) प्रश्न विचारलेत मात्र, जाब हा बरोबरीच्या माणसाला द्यायचा असतो. अशा चापलुशा, बदमाशी करून व मर्जी मिळवून पद मिळवणाऱ्या लोकांना जाब विचारून अथवा त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देऊन त्यांची उंची वाढवायची नसते. नवी दिल्ली येथे ९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चालू आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या ‘असे घडलो आम्ही’ या कार्यक्रमात शिवसेनेच्या (शिंदे) नेत्या व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेवर (ठाकरे) मोठा आरोप केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज कार दिल्यावर एक पद मिळायचं.

“नीलम गोऱ्हे ३० वर्षे ज्या पक्षात राहिल्या तिथे असं काही होत असेल तर नीलम गोऱ्हे यांनी एवढा पैसा कुठे ठेवला आहे? या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं पाहिजे. कारण ‘मातोश्री’वर (शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं निवासस्थान) त्यांच्याइतकं दुसरा कोणताही माणूस वावरत नव्हता. त्या मातोश्रीवरच असायच्या. त्यांनी कुठे-कुठे संपत्ती घेतली? परदेशात किती पैसे गुंतवले? या प्रश्नांची उत्तरं नीलम गोऱ्हे यांनी द्यायला हवीत. त्यांनी शिवसेनेला (ठाकरे) प्रश्न विचारलेत मात्र, जाब हा बरोबरीच्या माणसाला द्यायचा असतो. अशा चापलुशा, बदमाशी करून व मर्जी मिळवून पद मिळवणाऱ्या लोकांना जाब विचारून अथवा त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देऊन त्यांची उंची वाढवायची नसते. नीलम गोऱ्हे चार वेळा आमदार असल्या काय किंवा विधानसभेवर असल्या काय, आमच्या नजरेत त्या बदमाश व गद्दारच आहेत.नीलम गोऱ्हे म्हणाल्या, “कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचं काही कारण नाही. २०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या दिल्या की एक पद मिळतं ही वस्तूस्थिती आहे. बाळासाहेब ठाकरे होते तोवर त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली. २०१९ ला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा आम्हाला धन्यता वाटली होती. कारण बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाला ते पद मिळालं याचा आम्हाला आनंद झाला होता. पण आमदारांना भेटी मिळणं बंद झालं”. नवी दिल्ली येथे ९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चालू आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या ‘असे घडलो आम्ही’ या कार्यक्रमात शिवसेनेच्या (शिंदे) नेत्या व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेवर (ठाकरे) मोठा आरोप केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज कार दिल्यावर एक पद मिळायचं, असा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे. नीलम गोऱ्हे यांच्या या आरोपानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गोऱ्हे यांच्या या वक्तव्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. शिवसेनेकडूनही (ठाकरे) यावर प्रतिक्रिया आली आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी गोऱ्हे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. अंधारे यांनी गोऱ्हे यांचा चापलूस व गद्दार असा उल्लेख केला आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, “नीलम गोऱ्हे ३० वर्षे ज्या पक्षात राहिल्या तिथे असं काही होत असेल तर नीलम गोऱ्हे यांनी एवढा पैसा कुठे ठेवला आहे? या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं पाहिजे. कारण ‘मातोश्री’वर (शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं निवासस्थान) त्यांच्याइतकं दुसरा कोणताही माणूस वावरत नव्हता. त्या मातोश्रीवरच असायच्या. त्यांनी कुठे-कुठे संपत्ती घेतली?

# हलक्यात घेऊ नका हे विधान कोणाला?

## अजित पवारांचा सवाल अन् एकनाथ शिंदेंनीही दिलं उत्तर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्लीत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप झाला. या समारोपाच्या कार्यक्रमासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील उपस्थित होते. मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमानिमित्त एकनाथ शिंदे आणि अजित पवार एका व्यासपीठावर आले होते.**



### पवारांनी जोरदार फटकेबाजी

या कार्यक्रमाच्या भाषणात अजित पवारांनी जोरदार फटकेबाजी केली. अजित पवारांनी त्यांच्या भाषणात काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी केलेल्या ‘मला हलक्यात घेऊ नका’ या वक्तव्याचा उल्लेख करत थेट सवाल विचारला, तर अजित पवारांच्या प्रश्नावर एकनाथ शिंदे यांनीही उत्तर दिल्याचं पाहायला मिळालं. आता परवा दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असा काही शब्द वापरला की मला हलक्यात घेऊ नका. आता एकनाथ शिंदे नेमकं कोणाला म्हणाले तेच कळायला मार्ग नाही. मग मशालीने (ठाकरे गट) हलक्यात घ्यायचं नाही की अजून कोणाला घ्यायचं नाही?”, असा सवाल अजित पवारांनी विचारला.

या कार्यक्रमाच्या भाषणात अजित पवारांनी जोरदार फटकेबाजी केली. अजित पवारांनी त्यांच्या भाषणात काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी केलेल्या ‘मला हलक्यात घेऊ नका’ या वक्तव्याचा उल्लेख करत थेट सवाल विचारला, तर अजित पवारांच्या प्रश्नावर एकनाथ शिंदे यांनीही उत्तर दिल्याचं पाहायला मिळालं. आता परवा दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असा काही शब्द वापरला की मला हलक्यात घेऊ नका. आता एकनाथ शिंदे नेमकं कोणाला म्हणाले तेच कळायला मार्ग नाही. मग मशालीने (ठाकरे गट) हलक्यात घ्यायचं नाही की अजून कोणाला घ्यायचं नाही?”, असा सवाल अजित पवारांनी विचारला.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रश्नाला उत्तर दिलं. “मला हलक्यात घेऊ नका हे अडीच वर्षांपूर्वीचं होतं”, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केलीदरम्यान, अजित पवार यांनी यावेळी म्हटलं की, “एकनाथ शिंदे आणि मी एका व्यासपीठावर आलो की आमच्यावर कॅमेरे क्लोज असतात. एवढंच नाही तर आमच्या हावभावावरही लक्ष असतं, म्हणजे आमच्या चेहऱ्यावर हास्य आहे का नाही ते देखील पाहिलं जातं. त्यामुळे मी माझ्या मनाला नेहमी सांगतो की चेहरा प्रसन्न दिसला पाहिजे, नाहीतर दुसरी बातमी व्हायची, असं म्हणत अजित पवारांनी जोरदार टोलेबाजी केली. तसेच आमच्या अर्थात महायुतीत कोणतीही नाराजी नसल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

# भारताने अमेरिकेचा फायदा करून घेतलाय!

## भारताला निवडणुकांमध्ये मदत करण्यासाठी 21. कोटी डॉलर्स दिले



।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारतातील निवडणुकांसाठी २.१ कोटी डॉलरचा निधी दिल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकन मतदारांकडे लक्ष देण्याऐवजी आम्ही परदेशात मोठ्या प्रमाणात खर्च केला, असंही ते म्हणाले. कंझर्व्हेटिव्ह पॉलिटिकल ॲक्शन कॉन्फरन्समध्ये बोलताना ट्रम्प यांनी कागदी मतपत्रिका वापरण्याचा सल्ला भारताला दिला.**

भारताला त्यांच्या निवडणुकांमध्ये मदत करण्यासाठी २१. कोटी डॉलर्स दिले गेले. का? भारत बॅलेटवरील मतपत्रिकांवर परत का जात नाही? आपण भारताला निवडणुकांसाठी पैसे देत आहत. त्यांना पैशांची गरज नाही", असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.ते आमचा चांगला फायदा घेत आहेत. भारतात जगातील सर्वात जास्त कर आकारला जातो. तरीही आपण त्यांना निवडणुकीत मदत करण्यासाठी भरपूर पैसे देत आहत", असंही ते पुढे म्हणाले. रिपब्लिकन गव्हर्नर्स असोसिएशनमधील आपल्या भाषणात डोनाल्ड ट्रम्प यांनी बांगलादेशात राजकीय स्थिती बदलण्यासाठी एका फर्मला २.९ कोटी डॉलर्स निधी दिल्यावरूनही टीका केली.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दाव्यावर भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनीही उत्तर दिलं आहे. ते म्हणाले, "ट्रम्प प्रशासन लोकांना काहीही माहिती देतंय.हे खरंच चिंताजनक आहे.मी याचा शोध घेईन, त्यामुळे नक्कीच तथ्ये बाहेर येतील."या सगळ्या चर्चेच्या केंद्रस्थानी USAID अर्थात युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटनं मंजूर केलेले दोन प्रकारचे निधी प्रामुख्याने अमेरिकेच्या DOGE च्या रडारवर आहेत. कन्सॉर्टियम फॉर इलेक्शन्स अँड पॉलिटिकल प्रोसेस स्टेंदनिंग अर्थात CEPPS या वॉशिंग्टन डीसीमधील एका संघटनेच्या माध्यमातून हा अनुदानाचा निधी जारी करण्यात आला होता. त्यात पहिला निधी मॉलदोवमधील निवडणूक प्रक्रियेसाठी होता. हा निधी जवळपास २.२ कोटी डॉलर्स इतका होता. त्याशिवाय २.१ कोटी डॉलर्सचा निधी भारतातील निवडणूक प्रक्रियेचा उल्लेख करून देण्यात आला होता. पण प्रत्यक्षात हा निधी बांगलादेशसाठी देण्यात आल्याचे इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे.गेल्या आठवड्यातील कामगिरीची माहिती द्या, अन्यथा राजीनामा द्या, असा इमेल अमेरिकेतील सरकारी कर्मचाऱ्यांना येऊ लागले आहेत. यासंदर्भातल एलॉन मस्क यांनी आधीच इशाराही दिला होता. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळ आणि संताप निर्माण झाला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. ऑफिस ऑफ कार्मिक मॅनेजमेंटकडून हे इमेल सरकारी कर्मचाऱ्यांनी गेले आहेत. तुम्ही गेल्या आठवड्यात काय केलं? यासंदर्भात उत्तर द्या. सोमवारी ११.५९ पर्यंत याचं उत्तर देण्याचं आवाहन सरकारने केलं आहे. दरम्यान, सरकारी कर्मचारी कपातीची योजना डोनाल्ड ट्रम्प यांनी आखली असून ही योजना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एलॉन मस्क कार्यरत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आलेल्या हे ईमेलमुळे त्यांच्या भीतीचं वातावरण पसरलं आहे.ओपीएमच्या प्रवक्त्या मॅकलॉरिन पिनोव्हर यांनी जारी केलेल्या निवेदनात, "ट्रम्प प्रशासनाच्या कार्यक्षम आणि जबाबदार संघीय कार्यबलासाठी वचनबद्धतेचा भाग म्हणून ही विनंती करण्यात आली आहे. पिनोव्हरने सांगितले की एजन्सी व्यवस्थापक कर्मचाऱ्यांच्या प्रतिसादांचे पुनरावलोकन केल्यानंतर पुढील पावले निश्चित करतील.ईमेलमुळे कर्मचाऱ्यांच्या कामाप्रती असलेली सुरक्षितता धोक्यात आली आहे. संरक्षण किंवा तत्सम विभागात काम करणारे कर्मचारी परवानगीशिवाय त्यांच्या कामाची माहिती उघड करू शकत नाहीत. तसंच, दूरस्थ ठिकाणी तैनात करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना इमेलचा फारसा वापर करता येत नाही. तसंच, मोठ्या प्रमाणावर सरकारी कर्मचारी सुट्टीवर असल्याने ते सरकारी उपकरणे आणि इमेल वापरू शकत नाहीत. हे सांगा नाहीतर मी शनिवारी तुमचं घर जाळून टाकीन.भारताला त्यांच्या निवडणुकांमध्ये मदत करण्यासाठी २१. कोटी डॉलर्स दिले गेले. का? भारत बॅलेटवरील मतपत्रिकांवर परत का जात नाही? आपण भारताला निवडणुकांसाठी पैसे देत आहत. त्यांना पैशांची गरज नाही", असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.ते आमचा चांगला फायदा घेत आहेत. भारतात जगातील सर्वात जास्त कर आकारला जातो.

### पुन्हा महामारी येणार?

गेल्या काही दिवसांत प्रोबशनरी कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले होते. त्यामुळे दररोज नोकरीवरून काढून टाकण्याच्या भीतीने अनेक कर्मचारी दडपणाखाली आहेत. "मला माहीत नाही की आपण या मानसिक दहशतीचा सामना कसा करणार आहोत", असं राष्ट्रीय महासागरी आणि वातावरणीय प्रशासनातली एका कर्मचाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवरून वॉशिंग्टन पोस्टला प्रतिक्रिया दिली. सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनमधील एका कर्मचाऱ्याने वृत्तसंस्था असोसिएटेड प्रेसशी बोलताना अशाच भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "माझ्यासाठी, हे असे म्हणण्यासारखे आहे की, या आठवड्यात तुम्ही कोणती घरातील कामे केली.

---

# महिला मुख्यमंत्र्यांविरोधात महिला विरोधी पक्षनेता!

## आपने सोपविली आतिशींकडे महत्त्वाची जबाबदारी



।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्लीच्या मुख्यमंत्री पदी रेखा गुप्ता यांची निवड झाल्यानंतर आता आपने विरोधी पक्षनेताही जाहीर केला आहे. दिल्लीच्या माजी काळजीवाहू मुख्यमंत्री आतिशी आता दिल्लीच्या विधानसभेतील विरोधी पक्षनेत्या असतील. त्यामुळे या निमित्ताने दिल्लीत महिला विरुद्ध महिला असा सामना पाहायला मिळणार आहे.**

आम आदमी पक्षाला पराभव पत्कारावा लागल्यानंतर भाजपाने सत्ता स्थापन केली. मुख्यमंत्री पदासाठी रेखा गुप्ता यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं असून २५ फेब्रुवारी रोजी सर्व आमदार पदाची शपथ घेणार आहेत. याच पार्श्वभूमीवर आपच्या नेत्यांनी आतिशी यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली.

आज दुपारी १ वाजता आमदार आणि वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांसह आणि त्यांच्या आघाडीच्या संघटनांच्या प्रभारींबरोबर बैठक घेतली. निवडणुकीदरम्यान त्यांच्या भूमिकांचे मूल्यांकन करण्यासाठी लोकसभा, जिल्हा, विधानसभा आणि वॉर्ड पातळीवरील सर्व कार्यकर्त्यांचे ऑडिट जाहीर करण्याचे आवाहन करण्यात आले.नवनिर्वाचित विधानसभेचे सदस्य (आमदार) २५ फेब्रुवारी रोजी शपथ घेतील, तर १४ प्रलंबित कॅग अहवाल दुसऱ्या दिवशी मांडले जातील. मागील आप सरकारच्या कार्यकाळापासून प्रलंबित असलेले कॅग अहवाल सादर करण्यास मान्यता रेखा गुप्ता यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिली.


### समस्या सोडवण्याचा सल्ला

आगामी अर्थसंकल्पावरील बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविले. यामध्ये सर्व कॅबिनेट मंत्री आणि विभाग प्रमुख उपस्थित होते. निवडणूक निकालानंतर माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची त्यांच्या निवासस्थानी पक्षाच्या विजयी उमेदवारांनी भेट घेतली. यावेळी केजरीवाल यांनी त्यांना लोकांसाठी काम करण्याचा आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा सल्ला दिला. पक्ष रचनात्मक विरोधक म्हणून काम करेल असे आतिशी यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी सांगितले.

# ‘लाखात एक आमचा दादा’मध्ये येणार सूर्या दादाची खरी आई!

‘झी मराठी’ वाहिनीवर प्रसारित होणारी ‘लाखात एक आमचा दादा’ ही मालिका गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत तुळजाची भूमिका साकारणाऱ्या मुख्य अभिनेत्रीने प्रकृतीच्या कारणास्तव या मालिकेतून एक्झिट घेण्याचा निर्णय घेतला. आता ‘तुळजा’च्या रुपात मालिकेत मृण्मयी गोंधळेकरची एन्ट्री झालेली आहे. यापूर्वी तिने ‘सुख म्हणजे नक्की काय असतं’ या मालिकेत राजमाची भूमिका साकारली होती. आता नव्या तुळजाला प्रेक्षक कसा प्रतिसाद देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

सध्या मालिकेत सूर्या आणि तुळजामध्ये वाद निर्माण झाल्याचा सीक्वेन्स चालू आहे. मालिकेत जालिंदरच्या घरातील पार्टीत गोंधळ झाल्यानंतर, सूर्या त्याच्या बहिणींना घरी घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी, त्याच्या चारही बहिणी त्याला त्याची चूक लक्षात आणून देतात. आता सूर्या दादा तुळजाची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत आहे. अशातच, जगताप कुटुंबीयांच्या घरी धनूला एक स्थळ पाहायला येतं. यावेळी सूर्या मोठ्या काळजीत पडतो कारण, तुळजाशिवाय पाहुणे लग्नाचा प्रस्ताव नाकारू



शकतात...याची त्याला पूर्ण खात्री असते. तुळजाला किमान धनूच्या लग्नाची बोलणी होईपर्यंत तरी थांबण्याची विनंती सूर्या करतो. पाहुणे तुळजाच्या अनुपस्थितीबद्दल विचारपूस करतात. जालिंदर सूर्या आणि तुळजामधील संघर्ष उघड करणार तेवढ्यातच तुळजा दारात येते. यावेळी मालिकेत मृण्मयीची एन्ट्री होणार आहे.तर, आता येत्या काळात तुळजाला वैद्यकीय शिबिरासाठी जेलमध्ये बोलावलं जातं. योगायोगाने, हे तेच जेल आहे जिथे सूर्याची खरी आई आहे आणि जालिंदरला कळतं की ती पॅरोलवर सुटणार आहे. जालिंदरला हे ही समजलंय सूर्या आणि तुळजा याच जेलमध्ये शिबिरासाठी जाणार आहेत. आता जालिंदर सूर्या आणि त्याच्या आईची भेट टाळू शकेल? सूर्या आणि त्याच्या आईची तुरुंगात भेट होईल का? याची उत्तर प्रेक्षकांना ‘लाखात एक आमचा दादा’ मालिकेच्या आगामी भागात मिळणार आहेत.नव्या तुळजा पाठोपाठ मालिकेत सूर्याची आई म्हणून आणखी एका अभिनेत्रीची मालिकेत एन्ट्री झाली आहे. या अभिनेत्रीचं नाव आहे राजश्री निकम. या मालिकेत ती सूर्या दादाच्या आईची भूमिका साकारणार आहे.

## सुंदरी’ मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## हार्ट इमोजी, जोडलेले हात



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियांका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल ॲवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियांकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे. प्रियांका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियांका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे ॲक्शन आणि कटच्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियांका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वतःला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्लॅन, किस्मत, असंभव सारख्या सिनेमांत तिने काम केलं. 2005 मध्ये आलेला 'मुझसे शादी करोगी' या सिनेमातील प्रियंकाच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली.

## 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्वत्र महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



## विश्वास नांगरे पाटील यांनी पाहिला ‘छावा’

‘छावा’ चित्रपटाची सध्या बॉक्स ऑफिसवर क्रेझ पाहायला मिळत आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या सिनेमात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्य गाथा दाखवण्यात आली आहे. चित्रपटात विकी छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत आहे, तर रश्मिका मंदाना महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत आहे. अभिनेता अक्षय खन्नाने औरंगजेबाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाबद्दल सेलिब्रिटी व राजकीय नेते प्रतिक्रिया देत आहेत. अशातच या सिनेमाबद्दल आयपीएस विश्वास नांगरे पाटील यांनी केलेल्या पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे. विश्वास नांगरे पाटील यांनी विकी कौशलचा छत्रपती संभाजी महाराज यांच्या लूकमधील एक फोटो पोस्ट केला आहे.छत्रपती संभाजी महाराज हे एक गारूड आहे, मराठी माणसाच्या स्वभिमानाचे, स्फुल्लिंगाचे प्रतीक आहेत, असं पाटील यांनी लिहिलं आहे.छत्रपती संभाजी महाराज हे एक गारूड आहे, मराठी माणसाच्या स्वभिमानाचे, स्फुल्लिंगाचे प्रतीक आहे, स्वराज्याच्या स्वप्नाचे जिवंत, मूर्तिमंत द्योतक आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रौढ, प्रताप, पुरंदर स्वरूप आहे. असा पराक्रमी, शूर आणि चतुरस्त्र भूप होणे नाही. प्रभु शंभूराजे, शतशः नमन तुम्हाला! काय घ्यावं आम्ही मावळ्यांनी तुमच्या धगधगत्या आयुष्यातून? आम्ही घ्यावा निर्भयपणा, आम्ही सोडावी लाचारी आणि गुलामगिरी, विचारांची आणि कृतींची आम्ही सोडावं.

# रोहितचं भारताच्या विजयानंतर मोठं वक्तव्य

## विराटच्या शतकामुळे भारताचा विजय अधिकच खास

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विराट कोहलीचं शतक, शुबमन गिल-श्रेयस अय्यरची अर्धशतकी खेळी आणि भारतीय गोलंदाजांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने पाकिस्तानवर ६ विकेट्सने मोठा विजय मिळवला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण संघ मोठी धावसंख्या न करता २४१ धावांवरच सर्वबाद झाला. तर भारतीय संघाने प्रत्युत्तरात ४२.३ षटकांत २४४ धावा करत दणदणीत विजय मिळवला.**




२४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताकडून विराट कोहलीने शतक झळकावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. तर शुबमन गिल आणि श्रेयस अय्यरने विराट कोहलीला चांगली साथ देत पाकिस्तानच्या गोलंदाजांना टिकू दिले नाही. तर रोहित शर्माने चौकार-षटकारांसह भारताला चांगली सुरूवात करून दिली. भारताच्या फलंदाजीपूर्वी भारताच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत पाकिस्तानला धावा करू दिल्या नाहीत. पाकिस्तानने पहिल्या १० षटकांत २ विकेट गमावत ५७ धावा केल्या. पण ११ ते २० या षटकांत टीम इंडियाच्या फिरकीपटूंनी आणि वेगवान गोलंदाजांनी अशी काही गोलंदाजी केली की रिझवान आणि सौद शकील अवघ्या २८ धावा करू शकले. शकील आणि रिझवानने शतकी भागीदारी केली खरी पण भारताच्या गोलंदाजांवर हावी होऊ शकले नाहीत. भारताच्या विजयानंतर बोलताना रोहित शर्मा म्हणाला, “आम्ही ज्या पद्धतीने चेंडूने सुरुवात केली ती चमकदार होती. कमी धावसंख्येवर पाकिस्तानला रोखणं म्हणजे गोलंदाजी युनिटने खरोखरच चांगली कामगिरी केली. प्रकाशात फलंदाजी थोडी चांगली होते हे आम्हाला माहीत होते. पण आम्ही आमच्या अनुभवाचा उपयोग करत फलंदाजांनी लक्ष्याचा पाठलाग करण्याचा निर्णय घेतला. याचे श्रेय अक्षर, कुलदीप आणि जडेजा या खेळाडूंना जाते. ज्यांनी मधल्या षटकांमध्ये उत्कृष्ट गोलंदाजी केली. रिझवान-शकीलने चांगली भागादारी रचली पण आम्हाला त्यांना सामन्यावरची आमची पकड कमी करू द्यायची नव्हती.रोहित पुढे म्हणाला, “खेळ निसटू न देणं महत्त्वाचे होते. हार्दिक, शमी आणि हर्षित यांनीही ज्या पद्धतीने गोलंदाजी केली तेही विसरता कामा नये. आपण जर गोलंदाजी युनिटची कामगिरी पाहिली तर प्रत्येक खेळाडूने पुढे येत विकेट घेतले आणि जे खूप महत्त्वाचं होतं. ही सगळी मुलं, या फॉरमॅटमध्ये आम्ही एकत्र खूप खेळलो आहोत. मुख्य म्हणजे हा फॉरमॅट आणि त्यांना त्यांची जबाबदारी चांगली माहित आहे. कधीकधी सर्वच गोलंदाजांना १० षटकं टाकण्याची संधी मिळत नाही, कारण सहा गोलंदाज संघात आहेत. अक्षर-कुलदीपने आज चांगली कामगिरी केली. गेल्या सामन्यात जडेजाने कामगिरी केली होती.

### सहा गोलंदाज संघात आहेत

विराट कोहलीबद्दल रोहित शर्मा म्हणाला, “त्याला देशाचं प्रतिनिधित्व करायला आवडतं. त्याला मैदानावर जात संघासाठी खेळायचं असत. गेल्या काही वर्षांत त्याने हीच कामगिरी करताना आपण पाहिलं आहे. ड्रेसिंग रूममध्ये बसलेल्या कोणालाच त्याच्या या खेळीच आश्चर्य वाटले नाही.२४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताकडून विराट कोहलीने शतक झळकावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. तर शुबमन गिल आणि श्रेयस अय्यरने विराट कोहलीला चांगली साथ देत पाकिस्तानच्या गोलंदाजांना टिकू दिले नाही. तर रोहित शर्माने चौकार-षटकारांसह भारताला चांगली सुरूवात करून दिली. भारताच्या फलंदाजीपूर्वी भारताच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत पाकिस्तानला धावा करू दिल्या नाहीत.

# संघाच्या कामगिरीने सचिन तेंडुलकरही अवाक्

## कोहलीने विजयी चौकार लगावला आणि भारताला विजय मिळवून दिला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत आज (२३ फेब्रुवारी) भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना दुबईतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पार पडला. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या या सामन्यात भारत आणि पाकिस्तान आमने-सामने असल्यामुळे जगभरातील क्रिकेट प्रेमींचं याकडे लक्ष लागलं होतं. अखेर भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला नमवत सेमी फायनलमध्ये प्रवेशाच्या दृष्टीने दमदार पाऊल टाकलं. विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने पाकिस्तानविरूद्ध ६ विकेट्सने मोठा विजय मिळवला.**





या विजयासह भारताने पाकिस्तानकडून २०१७ च्या फायनलमधील विजयाचा बदला घेतला. कारण भारताने पाकिस्तानला पराभूत केल्याने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील त्यांचे आव्हान संपुष्टात आणले आहे. विराट कोहलीने जबरदस्त पुनरागमन करत पाकिस्तानविरूद्ध शतक झळकावले आणि भारताचा विजय निश्चित केला. विराट कोहलीने विजयी चौकार लगावला आणि भारताला विजय मिळवून दिला. दरम्यान, भारताने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनेही एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे.

एका बहुप्रतिक्षित सामन्याचा परिपूर्ण शेवट, एक वास्तविक नॉकआउट”, असं म्हणत टीम इंडियाचं अभिनंदन केलं आहे. तसेच विराट कोहलीने केलेल्या शानदार शतकाचंही सचिन तेंडुलकरने कौतुक केलं आहे. तसेच टीम इंडियाच्या बॉलर्सचंही कौतुक केलं आहे.टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये इतिहास लिहिला. विराटने एका खास यादीत जगातील सर्व फलंदाजांना मागे टाकले आहे. त्याने एक विक्रम आपल्या नावावर केला आहे जो आतापर्यंत क्रिकेटचा देव असलेल्या सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. पाकिस्तानविरुद्ध सामन्यात १५ धावा करत विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये १४ हजार धावा पूर्ण करून इतिहास लिहिला आहे. तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १४ हजार धावा करणारा फलंदाज आहे. त्याने केवळ २८७ डावांमध्ये ही कामगिरी केली आहे. कोहलीने महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा १९ वर्ष जुना विश्वविक्रम मोडला आहे. सचिनने वनडे क्रिकेटमध्ये ३५० डावात १४ हजार धावा पूर्ण केल्या होत्या. सचिनने २००६ साली पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावून या धावा पूर्ण केल्या होत्या. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात १४ हजार हून अधिक धावा करणारा विराट कोहली हा केवळ तिसरा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी भारताचा सचिन तेंडुलकर (१८,४२६ धावा) आणि श्रीलंकेचा कुमार संगकारा (१४२३४ धावा) यांनी ही कामगिरी केली होती.

### 14 हजार धावा पूर्ण करून इतिहास

एका बहुप्रतिक्षित सामन्याचा परिपूर्ण शेवट, एक वास्तविक नॉकआउट”, असं म्हणत टीम इंडियाचं अभिनंदन केलं आहे. तसेच विराट कोहलीने केलेल्या शानदार शतकाचंही सचिन तेंडुलकरने कौतुक केलं आहे. तसेच टीम इंडियाच्या बॉलर्सचंही कौतुक केलं आहे.टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये इतिहास लिहिला. विराटने एका खास यादीत जगातील सर्व फलंदाजांना मागे टाकले आहे. त्याने एक विक्रम आपल्या नावावर केला आहे जो आतापर्यंत क्रिकेटचा देव असलेल्या सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. पाकिस्तानविरुद्ध सामन्यात १५ धावा करत विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये १४ हजार धावा पूर्ण करून इतिहास लिहिला आहे.

# महाईन्यूज

ePaper

।सोमवार।

।दि. 24 फेब्रुवारी 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

## 63 लाखांचा मुद्देमाल जप्त

# आंतरजिल्हा गांजा तस्करी रॅकेट उद्ध्वस्त!

## गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला यश

।पुणे।प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पिंपरी-चिंचवड: आंतरजिल्हा गांजा तस्करी करणारे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला यश आले आहे. ९६ किलो गांजा आणि २ चारचाकी वाहनांसह ६३ लाख ३१ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुणे-नाशिक महामार्गावर रोहकल फाटा (ता. खेड) येथे शुक्रवारी (दि.२१) दुपारी बाराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.**



चाकण पोलिस ठाण्यात याबाबत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संजय पांडुरंग मोहिते (वय ३९, रा. गोवित्री, ता. मावळ, जि. पुणे) मन्साराम नुरजी धानका (वय ४०, रा. हुरेपाणी, ता. शिरपूर, जि. धुळे) तसेच एक महिला आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी ६३ लाख ३१ हजार २०० रुपये किमतीचा गांजा व अन्य मुद्देमाल जप्त केला. ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा, ३ मोबाईल, २ चारचाकी वाहने आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

सहायक पोलिस निरीक्षक विक्रम गायकवाड अणि पथक हे चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्या वेळी पोलिस अधिकारी विक्रम गायकवाड आणि पोलिस अंमलदार निखिल वर्षे यांना माहिती मिळाली होती की, सिल्व्हर रंगाची टोयाटो इनोव्हा आणि पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी इको या दोन वाहनांमध्ये गांजा असल्याचे आढळले होते. तसेच, ही वाहने चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रोहकल फाटा येथून जाणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी ही माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील यांना कळविली. त्यांनी तत्काळ २ पथके तयार करून संबंधित वाहनांचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार, रोहकल फाटा येथे नाकाबंदी केली. या नाकाबंदीदरम्यान दोन चारचाकी वाहने ताब्यात घेण्यात आली. संबंधित वाहनांमध्ये पाहणी केली असता एकूण ६ गांजा असलेली पोती आढळून आली.

**अंमली पदार्थ विरोधी पथकाची करवाई...**

पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलिस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त वसंत परदेशी, पोलिस उपआयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे १) विशाल हिरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे २) बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली. पथकामध्ये वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील, सहायक पोलिस निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलिस अंमलदार प्रदीप शेलार, किशोर परदेशी, मयूर वाडकर, शिल्पा कांबळे, निखिल शेटे, निखिल वर्षे, कपिलेश इगवे, मितेश यादव, चिंतामण सुपे, सुनिल भागवत, महादेव बिक्कड तांत्रिक विश्लेषण विभागाचे प्रकाश ननावरे तसेच यांच्या पथकाने केली आहे.

# शिक्षक भरतीसाठी पात्रताधारक प्रतिक्षेत!

## शिक्षण विश्व: व्यवस्थापनांना 28 फेब्रुवारीपर्यंत जाहिरातींची मुदत

।पुणे।प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यातील दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरतीसाठी हजारो पात्रताधारक प्रतीक्षेत आहेत. मात्र, पवित्र संकेतस्थळावर भरतीच्या पदांसाठीच्या जाहिराती देण्यास मुदतवाढ देण्यात आल्याचे जाहीर केले असून, आता व्यवस्थापनांना २८ फेब्रुवारीपर्यंत जाहिराती देता येणार आहेत.**



राज्यात पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यातील भरतीमध्ये निवड झालेल्या सुमारे १८ हजार उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यातील भरतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील रिक्त पदे, खासगी अनुदानित शाळांतील रिक्त पदांवर भरती होणार आहे.

त्याशिवाय, पहिल्या टप्प्यातील रिक्त पदांचा समावेश दुसऱ्या टप्प्यातील भरती प्रक्रियेत केला जाणार आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यात किती पदे उपलब्ध होणार, याकडे राज्यभरातील पात्रताधारकांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर, दुसऱ्या टप्प्यातील भरतीसाठी शिक्षण विभागातर्फे जाहिराती देण्यासाठी २० जानेवारी ते २० फेब्रुवारीची मुदत देण्यात आली होती.

शिक्षण विभागाने पवित्र संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील १ हजार २०१६ व्यवस्थापन आणि विविध माध्यमांसाठी एकूण १३३७ जाहिरातींची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, बऱ्याच व्यवस्थापनांना जाहिरात देण्यास अजून काही कालावधीची आवश्यकता असल्याने पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**अडचणी भासल्यास इथे संपर्क साधा...**

राज्यातील सर्वच शैक्षणिक व्यवस्थापनांनी त्यांच्या अखत्यारितील शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याची कार्यवाही करावी. पवित्र पोर्टलवर जाहिरात देण्यासाठी काही अडचणी आल्यास EDUPAVITRA2022@GMAIL.COM या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती HTTPS://TAIT2022.MAHATEACHERRECRUITMENT.ORG.IN या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046